**विशेष लेख :**

# छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल : क्रीडा वैभवाचा मुकूटमणी.

जळगाव शहराच्या मध्यवर्ती भागात छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलाचे स्वप्न ३० वर्षानंतर पूर्ण झाले आहे. क्रीडा संकुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर लगेचच त्याचे उद्‌घाटन देशाचे सर्वोच्च पद असणाऱ्या भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते होणारे हे राज्यातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील एकमेव क्रीडा संकुल असावे.

भारत देश आज जागतिकीकरणाच्या स्पर्धेत सर्वोच्च पदावर पोहोचण्याच्या अवस्थेत आहे. जवळपास प्रत्येक क्षेत्रात आज आपला देश प्रगतीपथावर आहे. मात्र एक गोष्ट अशीही आहे की आपला देश ऑलिंपिकसारख्या जागतिक दर्जाच्या स्पर्धांमध्ये मात्र घवघवीत यश मिळवू शकलेला नाही. एकीकडे भारतातील कोटयावधी लोक क्रिकेटप्रेमात अक्षरशः वेडे होऊन जातात. सचिन, गांगुली, द्रविड, धोनी चाहत्यांच्या गळयातील ताईत बनतात. हॉकीत भारताचा दबदबा कायम आहे. सानिया मिर्झा आपल्या खेळाने व दिलखेचक अदांनी क्रीडा रसिकांची दिलकी धडकन बनली, विश्वनाथन आनंदची अतुलनीय कामगिरी भारताचे नांव जगभरात उज्वल करतेय. मात्र दुसरीकडे १०७ कोटींवर लोकसंख्या असलेल्या भारताचे नांव ऑलिम्पिक स्पर्धेतील गुणतालिकेत सर्वत्र खालच्या टप्प्यात असते. क्रीडा क्षेत्रातील ही विषमता गंभीर आणि चिंताजनक अशीच आहे. ऑलिम्पिक स्पर्धांमधील भारताच्या अपयशाचे प्रमुख कारण म्हणजे या राष्ट्रात ऑलिम्पिक स्पर्धेतील क्रीडा प्रकारांसाठी आवश्यक सुविधा नाहीत. कुणी कितीही नाकारले तरी ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच आता या विषयावर चिंतनाची प्रक्रिया सुरु झाली आहे. २१ व्या जगातील नवीन पिढीने या गंभीर विषयाची दखल घेतली आहे. गावागावातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने किमान जिल्हयाच्या ठिकाणी अत्याधुनिक यंत्रणेसह सुसज्ज अशी मैदाने, क्रीडा संकुले ही आता काळाची गरज बनली आहे, परंतू कोटयावधी रुपयांचे हे महत्वाकांक्षी प्रकल्प साकारण्यासाठी तेवढयाच महत्वाकांक्षी अधिकाऱ्यांची गरज आहे.

क्रीडा क्षेत्र एक व्यापक क्षेत्र. क्रीडा क्षेत्रातील विकाच सशक्त, तरुण पिढी घडविण्यासाठी मोलाची भूमिका बजावतो. क्रीडा क्षेत्रामुळे अनेकांचे नाव जगाच्या नकाशावर उमटावे

यासाठी जळगांव सुवर्ण नगरीमध्ये सुसज्ज असे क्रीडा संकुल असावे ही जळगांव वासियांची गेल्या अनेक वर्षापासूनची प्रतिक्षा जिल्हाधिकारी यांनी आपल्या प्रयत्नातून मार्गी लावली आहे. सुवर्ण नगरी ही क्रीडा नगरी व्हावी. जळगांव सारख्या छोटया शहरातही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा व्हाव्यात व जळगावातून नामांकित खेळाडूंचा उदय व्हावा या उदात्त हेतूने जिल्हाधिकारी विजय सिंघल यांनी प्रयत्न करुन हे क्रीडा संकुल पूर्णत्वास नेले. जळगांव जिल्हा या क्षेत्रासाठी अत्यंत अनुकूल. या जिल्हयाचे जिल्हाधिकारी विजय सिंघल यांचे या क्रीडा संकूलाच्या पूर्णत्वाच्या दृष्टीने विचारही अनुकूलच. सर्व काही अनुकूल, मग काय ? बघता बघता तमाम जळगाव वासियांचे स्वप्न पूर्ण झाले. तो सोनियाचा दिवस होता ८ फेब्रूवारी २००८ आणि विशेष म्हणजे हे स्वप्न सत्यात उतरले तेही महामहिम महान भारत देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्याच हस्ते जणू काही दुग्धशर्करा योगच. छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल उभारण्यात जिल्हाधिकारी विजय सिंघल यांचे महत्वाचे योगदान आहे. क्रीडा संकुलाच्या सुरुवातीला शासनाकडून केवळ ६३ लाखांचा निधी मिळाल्यानंतर व या संकुलातील व्यापारी गाळयांना फारसा प्रतिसाद न मिळताही जिल्हाधिकारी विजय सिंघल यांनी धडपड करुन व राज्य शासनाकडे पाठपुरावा करुन या क्रीडा संकुलासाठी शासनाकडून निधी आणला. जसजसे क्रीडा संकुल हे आकार घेत गेले तसतशी या संकुलातील गाळयांनाही मागणी वाढू लागली. केवळ अडीच ते तीन वर्षाच्या काळातच एक सुसज्ज असे क्रीडा संकुल उदयास आले ते विजय सिंघल यांच्या धडपडीनेच.

जिल्हावासियांना या क्रीडा संकुलाची सुमारे तीन दशकांपासून प्रतिक्षा होती. या क्रीडा संकुलासाठी प्रत्यक्ष १६ एकर जागेची आवश्यकता होती. मात्र शासनाकडे उपलब्ध होती केवळ ८ एकर म्हणजे निम्मे जागा. तरी या जागेत आर्कीटेक्ट शिरीष बर्वे यांनी या संकुलात विविध खेळांसह, भोजनगृह, होस्टेल या सुविधांसह सुसज्य अशा क्रीडा संकुलाची मांडणी करुन या मांडणीला प्रत्यक्ष अस्तित्वात आणले. क्रीडा संकुलासाठी राज्य शासनाकडून ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही प्रत्येक वेळी निधी कमी पडत गेला. मात्र जिल्हाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे २००६-०७ साली १ कोटी ५५ लाख तर २००७-०८ मध्ये १ कोटी ६२ लाख रुपयांचा निधी मिळाला. या अद्ययावत क्रीडा संकुलात आठ लेनचा ४०० मीटर ट्रॅक, मैदानी स्पर्धेसाठी आवश्यक असलेल्या बाबी, टर्फचे फुटबॉल व हॉकी मैदान, तसेच वूडन फ्लोअरींगचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे चार बॅडमिंटन कोर्टस, ४ टेबल टेनिस टेबल, अद्ययावत व्यायामशाळा, कॅरम, बुध्दीबळ, त्याचप्रमाणे योगा व ॲरोबिक्स हॉल आहेत. तसेच दोन कबड्डी मैदाने, दोन खो-खो मैदाने, दोन व्हॉलीबॉल मैदाने, सिमेंट फ्लोअरिंगचे बास्केटबॉल कोर्ट, लॉन टेनिस क्ले कोर्ट, फिल्टरेशन प्लॉन्ट व स्वतंत्र चेंजिंग रुमसह २५ बाय २१

मीटरचा जलतरण तलाव, १ स्क्वॅश कोर्ट, १ बिलीयर्ड टेबल, १५० खेळाडूंच्या निवासाची अॅटॅच टॉयलेट बाथरुमसह ४० खोल्या स्वतंत्र स्वयंपाकगृहासह १ भोजनगृह, बेसमेंटला २० कार्सची पार्कींग व्यवस्था यासारख्या अद्ययावत सोयींनी युक्त १० हजार प्रेक्षकांच्या बैठक व्यवस्थेसह असे राष्ट्रीय स्पर्धा आयोजनास परिपूर्ण जिल्हा क्रीडा संकुल निर्मित करण्याचा प्रयत्न अथक परिश्रमांनी पूर्ण झालेला आहे. हे क्रीडा संकुल शहराच्या मध्यवर्ती भागात असल्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर तर घालतेच मात्र जिल्हावासियांना अभिमानाची बाब आहे. या क्रीडा संकुलाचे उद्‌घाटन तर भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती व खान्देश कन्या महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते झाले. आता जिल्हयातील क्रीडाप्रेमींना प्रतिक्षा आहे ती या संकुलावर होणाऱ्या सामन्याची. ही क्रीडाप्रेमींची असलेली प्रतिक्षाही काही दिवसात पूर्ण होईल, यादृष्टीने सर्व हे प्रयत्नशील आहेत. जिल्हाधिकारी विजय सिंघल यांनी क्रीडा संकुल पूर्ण करण्याचा संकल्पच केला होता. जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाल्यानंतर सिंघल यांनी जळगांव जिल्हयात नदीजोड प्रकल्प, बर्ड फ्ल्यू, चिकनगुनिया असो की जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिवित वा वित्त हानी झालेली या प्रत्येकावर त्यांनी यशस्वीपणे मात केली आहे. तसेच त्यांनी जळगांव जिल्हाधिकारी कार्यालयाला **ISO 9001 : 2000** मानांकन मिळवून देऊन देशात **ISO 9001 : 2000** कार्यालय मिळविणारे पहिले जिल्हाधिकारी कार्यालय म्हणून ओळख करुन दिलेली आहे. तसेच त्यांचे जळगांव विमानतळासाठी यशस्वी प्रयत्न सुध्दा सुरु आहेत.

मात्र क्रीडा संकुलाची पूर्तता हा त्यांच्या जळगांव येथील कार्यकाळातील महत्वाचा टप्पा ठरणार आहे. यामुळे जिल्हयातील खेळाडू, क्रीडाप्रेमी त्यांची नेहमीच आभारी राहील.

हे सर्व सत्यात उतरविण्याकरीता त्यामागील पार्श्वभूमीही आपल्याला समजली तर खरोखरच या प्रकल्पाची व्यापकता, भव्य-दिव्यता याने आपले ऊर भरुन येईल आणि प्रत्येकात तो आत्मविश्वास जागृत होईल तो आपल्या भारताला ऑलिंपिक व तत्सम स्पर्धांमधील सुवर्ण पदकांची लयलुट करण्यास रोखू शकणार नाही.

१९७४ साली प्रथमतः शासनाच्या क्रीडा धोरणानुसार जिल्हा पेठ जळगांव सिटी सर्व्हे क्रमांक १९७७ क्षेत्र ३३७८४.०५ चौ.मी. या जागेवरील जिल्हा क्रीडा संकुल हे जिल्हाधिकारी जळगांव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या अंतर्गत विकसित करण्यासाठी हाती घेण्यात आले. त्या अनुषंगाने प्रथमतः क्रीडा संकुल मुख्य प्रेक्षागृह तळ मजला १२ फुट बाय २० फुट, २५ दुकाने, कंपाऊंड वॉल, ४०० मीटर ट्रॅक व क्रीडांगण अशा बाबी सुचविण्यात आल्या होत्या ती कामे अपूर्ण अवस्थेत होती.

१९९७ साली जिल्हा क्रीडा संकुल समिती विसर्जित करण्यात आली. बरखास्त झालेल्या क्रीडा संकुल समितीच्या ताब्यात असलेली जागा, झालेल्या संपूर्ण बांधकामासह एक रुपया नाममात्र भाडयाने ५० वर्षाकरीता नगरपालिका जळगांव यांच्याकडे वर्ग करण्यात आली. नगरपालिकेने सदर क्रीडा संकुल पूर्णत्वास नेले नाही. त्यामुळे शासनाच्या सन २००४ च्या क्रीडा धोरणानुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा संकुल समिती नव्याने पुन्हा गठीत करण्यात येऊन धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत करण्यात आली.

सदरची जागा जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे क्रीडा संकुलाच्या निर्मितीसाठी हस्तांतरीत व्हावी म्हणून जिल्हयातील क्रीडा संघटनांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग घेतला. महानगरपालिका जळगांच्या तत्कालीन महापौर व सन्माननीय सदस्य यांनी एकमताने ठराव पारित करुन महापालिकेने सदरची जागा जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे हस्तांतरीत केली. जागेची हस्तांतरण झाल्यानंतर जिल्हा क्रीडा संकुल समिती जोमाने कामाला लागली व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आर्कीटेक्ट श्री.शिरीष बर्वे यांची नियुक्ती करुन जिल्हा क्रीडा संकुलाचे नकाशे व आराखडे तयार करुन घेतले. महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व सुवकसेवा संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री.अनिल डिग्गीकर यांनी सादर झालेल्या प्रस्तावावर अतिशय जलदगतीने कार्यवाही करुन सादर केलेला आराखडा व इस्टीमेटला प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी दिली. तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी मिळाल्यावर तत्कालीन विधानसभा अध्यक्ष मा.ना. श्री.अरुणभाई गुजराथी यांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन पालकमंत्री मा.ना.श्री.सुरेशदादा जैन यांच्या शुभहस्ते दिनांक २८-०८-२००४ रोजी भुमीपूजन करण्यात आले. भुमीपूजनानंतर मे.ई.सी.पी.हाऊसिंग प्रा.लि.यांना बांधकामाचा ठेका देण्यात आला. जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष मा.श्री.भवरलालजी जैन यांच्या शुभहस्ते दिनांक २५-०९-२००४ रोजी मशिनरीची पुजा करुन प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यात आली.

जिल्हा क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी क्रीडा व युवकसेवा संचालकांनी सन २००५-०६-०७ व २००७-०८ मध्ये टप्प्याटप्प्याने अनुदानाची रक्कम एकूण रुपये ४.०० कोटी उपलब्ध करुन दिलेली आहे. आजपर्यन्त क्रीडा संकुलासाठी एकूण १०.५० कोटी खर्च झालेला आहे. या अनुदानाव्यतिरिक्त उर्वरित खर्च व भविष्यात देखभाल दुरुस्तीचा खर्च भागविण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुल समितीने नवीन ९४ दुकानेही निर्माण केलेले असून ती जळगांव शहरातील व्यापाऱ्यांना २८ वर्षाच्या भाडेतत्वाने उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्या दुकानाच्या येणाऱ्या अनामत रक्कमा व भाडे यातून हा प्रकल्प पूर्ण झालेला आहे. दिनांक ८ फेब्रूवारी २००८ रोजी भारत गणराज्याच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील यांच्या शुभहस्ते सदर जिल्हा क्रीडा संकुलाचा भव्य लोकार्पण

सोहळा आयोजित करण्यात आलेला होता. सदर उद्‌घाटन समारंभास मा.ना.श्री.विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री.माणिकराव गावित, केंद्रीय गृहराज्य मंत्री, मा.ना.श्री.वसंत पुरके, मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा, मा.ना.श्री.विजयकुमार गावित, मंत्री, आदिवासी विकास तथा पालकमंत्री, जळगांव जिल्हयातील सर्व खासदार व सर्व आमदार, मा.श्री.संजय चहांदे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, मा.श्री.लक्ष्मीकांत देशमुख, संचालक, क्रीडा व युवक सेवा उपस्थित होते. वरील सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलाचे कामकाज, समारंभ व त्याच्या आयोजनाबाबत मनःस्वी समाधान व आनंद व्यक्त केलेला असून या गौरवास्पद कामगिरीबद्दल कौतुक केलेले आहे, ही जळगाव वासियांना अत्यंत अभिमानाची व गौरवाची बाब असून सदरचा प्रसंग जळगांवच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविला गेला आहे. महामहिम राष्ट्रपती यांनी जिल्हा क्रीडा संकुल येथे येऊन क्रीडा संकुलाची व वेगवेगळया सुविधांची बारकाईने पहाणी करुन अतिशय समाधानही व्यक्त केले. तसेच क्रीडा संकुलाबाबत सविस्तर माहितीही त्यावेळी जाणून घेतली. महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील जेव्हा टेबल टेनिसच्या टेबलजवळ आल्या तेव्हा मान्यवरांनी त्यांना खेळण्याची विनंती केली तेव्हा त्यांना टेबल टेनिस खेळण्याचा मोह आवरता आला नाही. त्यांच्यातील खेळाडू वृत्ती जागृत होऊन त्या पूर्वीच्याच उत्साहाने व जोमाने टेबल टेनिस खेळल्यात. त्यांचा खेळ पाहून मा.ना.मुख्यमंत्री तसेच इतर मान्यवरांनी त्यांच्या खेळाची वाहवा केली व मनमोकळयापणाने स्तुती केली. महामहिम राष्ट्रपती हया त्यांच्या कॉलेज जीवनात टेबल टेनिस खेळात चॅम्पियन होत्या. जिल्हा क्रीडा वैभवाचा मुकुटमणी ठरलेल्या या जिल्हा क्रीडा संकुलामुळे जळगांव शहर व जिल्हयातील खेळाडूंना एक राष्ट्रीय दर्जाचे सर्व सुविधायुक्त असे भव्य क्रीडा संकुल उपलब्ध झाल्यामुळे जळगांव जिल्हयातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकणारे खेळाडू निश्चितच निर्माण होतील आणि लवकरच ऑलिंपिकसारख्या स्पर्धेत पदकांच्या तालिकेत अमेरिका, चीन, जापान या देशांबरोबरच भारतीय खेळाडूंची नावेही अग्रक्रमाने असतील यात शंकाच नाही.